# प्रकरण दुसरे

# प्रकरण दुसरे
# साहित्याचे परिशीलन आणि पध्दतीशास्त्र
# (Review of Literature and Methodology)

## २.० प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरण दोन विभागात विभागले आहे. पहिल्या भागात समर्पक संशोधन साहित्याचे परिशीलन सादर केले असून, दुस-या विभागात प्रस्तुत अभ्यासासाठी ज्या संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे त्यासंबंधीचे विवेचन केले आहे.

## विभाग - १

## २.१ साहित्याचे परिशीलन

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात ग्रामीण भागातील पाणी पुरवठा, स्वच्छतागृहांची उपलब्धता, सार्वजनिक स्वच्छता, पर्यावरण संरक्षण या बाबींवर विशेष भर देण्यात आला आहे. लोकसहभागातून वरील बाबींमध्ये सुधारणा घडून येणे शासनाला अभिप्रेत आहे. या दृष्टीने पाहता, भारतातील आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील पाणी पुरवठा आणि स्वच्छतागृहांची उपलब्धता याविषयीची प्रकाशित माहिती तसेच संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाबाबत झालेले पूर्वीचे अभ्यास हे प्रस्तुत शोधनिबंधासाठी समर्पक साहित्य मानण्यात आले आहे. त्यानुसार संबंधित विषयावरील उपलब्ध साहित्याचे थोडक्यात परिशीलन प्रस्तुत विभागात सादर केले आहे. भारत सरकारच्या "Water Supply and Sanitation" विभागाच्या http/www.planingcommission.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध असलेला Water and Sanitation Assessment Report या शीर्षकाचा अहवाल, वेबसाईवर उपलब्ध असलेला Country Paper तसेच शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातील एम. ए. भाग-२ च्या विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या अमंलबजावणी संदर्भात केलेले प्रकल्प अहवाल इत्यादी साहित्य सामग्रीचे परिशीलन प्रस्तुत विभागात करण्यात आले आहे.

नियोजन आयोगाच्या "Water Supply and Sanitation in India" या शीर्षकाच्या अहवालात (२००३) नमूद केल्याप्रमाणे, शुध्द पाणी हे पाणी पुरवठा व स्वच्छतेसाठी अत्यावश्यक आहे. परंतु संपूर्ण भारतात शुध्द पाण्याची उपलब्धता असमान आहे. याशिवाय राज्या-राज्यानुसार प्रदेशा-प्रदेशानुसार व राज्यांतर्गत देखील शुध्द पाण्याच्या उपलब्धतेमध्ये मोठी विषमता आढळून येते.

भारतातील ग्रामीण लोकसंख्येपैकी ६९ ते ७४ टक्के लोकांना सुरक्षित स्त्रोताच्या माध्यमातून पिण्याचे पाणी उपलब्ध होते. उरलेल्या २६ ते ३१ टक्के लोकांना मात्र पिण्याच्या पाण्याचा सुरक्षित स्त्रोत उपलब्ध नाही. भारतातील शहरी लोकसंख्येच्या तुलनेत ग्रामीण पाणीपुरवठ्याच्या सुरक्षित सुविधा कमी प्रमाणात आहेत. ९१ ते ९३ टक्के शहरी लोकसंख्येला पिण्याच्या पाण्याचे सुरक्षित स्त्रोत उपलब्ध आहेत असे जागतिक आरोग्य संघटना व युनिसेफ यांनी पुरविलेल्या माहितीतून स्पष्ट होते. याशिवाय पाणी पुरवठा विभागामार्फत ग्रामीण वस्त्यांना पूर्णपणे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देता आलेले नाही.

नियोजन आयोगाने दिलेल्या आकडेवारीनुसार ८ व्या पंचवार्षिक योजनेत केवळ १८ ते १९ टक्के ग्रामीण कुटुंबाना शौचालयाची सुविधा उपलब्ध होती आणि त्याचकालावधीत ७५ ते ८१ टक्के शहरी कुटुंबाना शौचालयाची सुविधा उपलब्ध होती. शहरी भागात वैयक्तिक शौचालयाचे प्रमाण अधिक असण्याचे कारण म्हणजे महानगरात घरगुती शौचालय असणे अनिवार्यच आहे. ग्रामीण भागात शौचालयाचे प्रमाण कमी असण्याची अनेक कारणे सांगता येतील. स्वच्छतेपासून संभाव्य आरोग्याच्या फायद्याविषयी जाणीव जागृतीचा अभाव, वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी येणारा खर्च मोठ्या प्रमाणात असेल असा समज, शेतामध्ये त्याबरोबरच उघड्या जागेवर मल:विसर्जनाची सवय अशी विविध कारणे त्याला कारणीभूत आहेत. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या (National Family Health Survey) माहितीवरून असे दिसते की, शौचालयाच्या सुविधा अधिक लोकसंख्या असलेल्या व गरीब राज्यामध्ये राष्ट्रीय सरासरीपेक्षा कितीतरी प्रमाणात कमी आहे. त्यामध्ये आंध्रप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा, राजस्थान, तामिळनाडू व उत्तरप्रदेश या राज्यांचा समोवश होतो. केवळ

केरळमध्ये शौचालयाची सुविधा ८५ टक्के इतकी म्हणजे राष्ट्रीय सरासरीपेक्षा कितीतरी अधिक ३६ टक्के आहे.

दूषित पाण्यामुळे व त्यातील जंतूंच्या प्रादुर्भावामुळे अनेक प्रकारचे आजार होतात. त्यात यकृताला सूज येणे किंवा यकृताचा दाह होणे, पटकी(cholera), विषमज्वर (typhoid), आमांश/हागवण (dysentry) असे अनेक प्रकारचे आजार व्यक्तिला होतात. विविध माध्यमातून पाणी दूषित होते. ब-याच वेळा पाणी पुरवठ्याचे पाईप कमी दर्जाचे व त्याची देखभाल व्यवस्थित होत नसल्यामुळे या माध्यमातून देखील पाणी दूषित होते. घरात पिण्याचे पाणी योग्य पध्दतीने साठवून ठेवले नसल्यास अनेक प्रकारचे आजार होतात. पाण्याच्या दूषितीकरणामुळे होणा-या आजाराची तीव्रता पुढील परिस्थितीत अधिक वाढते.

१. पाण्याची अपुरी उपलब्धता

२. पाण्याची गुणवत्ता कमी असणे

३. गटारी मार्गातून गेलेल्या पिण्याच्या पाण्याचे पाईपची कमी देखभाल

४. मनुष्य, प्राणी व कौटुंबिक/घरगुती कचरा व विष्ठेच्या योग्य विल्हेवाटीचा अभाव

५. चांगल्या स्वच्छतेच्या जाणिवेचा अभाव

६. वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयींचा अभाव

अशा प्रकारे भारतीय नियोजन आयोगाच्या अहवालात ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता व आरोग्य अशा अनेक विषयाची गंभीर दखल घेण्यात आलेली आहे.

'South Asian Conference on Sanitation' या परिषदेकरीता तयार केलेल्या भारताविषयीच्या निबंधात असे नमूद केले आहे की, भारतातील ३,४५,००० प्राथमिक व माध्यमिक शाळेत पिण्याच्या पाण्याची सोय नाही. तसेच ५,७३,००० प्राथमिक व माध्यमिक शाळेत शौचालयाची सोय नाही.

महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाने अलीकडेच प्रकाशित केलेल्या 'जलस्वराज्य' या शीर्षकाच्या माहितीपुस्तिकेत महाराष्ट्रातील पाणी पुरवठा व स्वच्छताविषयक परिस्थितीची माहिती देण्यात आली आहे. सदर पुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने पाणी पुरवठा योजनांवर सन १९६० पासून भरपूर निधी खर्च केला आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आजवर रू. १६,६०० कोटी खर्च करण्यात आले आहेत. सध्या रू. १२५० कोटीची कामे सुरू आहेत. ग्रामीण स्वच्छता योजनांसाठी आजवर रू. ५५६ कोटी खर्च करण्यात आले आहेत. अशा प्रकारे भरपूर खर्च करून आपण भरपूर योजना निर्माण केल्या. राज्यातील २८,५०० ग्रामपंचायतीत ३.६० लाख योजना, म्हणजेच सरासरी ३३ कुटुंबामागे १ योजना व १ ग्रामपंचायतीमागे १२ योजना. त्याचप्रमाणे केवळ ३ वर्षात १६.६१ लाख शौचालये बांधली. ३०,००० कि. मी. गटार बांधकाम व राज्यात केवळ पिण्याच्या पाण्यासाठी खोदलेल्या विंधन विहीरींची एकूण लांबी २०,००० कि. मी. हे आजवरचे साध्य आहे. पण त्यामुळे ग्रामीण जनतेचा पाणी पुरवठा व स्वच्छतेचा प्रश्न अजूनही सुटला नाही.

२८,५०० ग्रामपंचायतीतील ८६,६८१ मनुष्यवस्त्यांपैकी २५,५०० वस्त्यांना पुरेसे पाणी (४० लि. प्रतिदिन प्रति व्यक्ती) मिळत नाही. सरासरी २०,००० वस्त्यांना दरसाल पाणी टंचाईची झळ (२० लि. प्रति दिन प्रति व्यक्ती) पोहोचते. दरवर्षी सरासरी ५५०० वस्त्यांना टँकरने पाणी पुरवठा होतो. दरवर्षी टंचाईच्या तात्पुरत्या उपाययोजनांवर सरासरी रू. १०० कोटी खर्च होतो. सर्वच बाबतीत शासनावर अवलंबून राहण्याची जनमानसात रूजवलेली व रूजलेली सवय हे सर्व अनर्थाचे मूळ म्हणता येईल. अर्थात ही सवय लावण्यात आपण सर्वच प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे जबाबदार आहोत. सन १९६० पूर्वी ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी शासनाचा हस्तक्षेप अगदी कमी होता. तो सुध्दा साधी विहीर, रहाट, खिराडी अशा साध्या उपाययोजनांपुरता आणि 'एक गाव एक पाणवठा' या सामाजिक जाणिवेपुरता मर्यादित होता. त्यानंतर शासनाने पुरवठा आधारित कार्यक्रम सुरू झाले. पाण्यापेक्षा भव्य दिव्य तंत्रज्ञानावर भर दिला गेला. मिळेल तेथून पाणी उपसा किंवा दूरवरून ओढून आणा, जेवढी मोठी योजना, जेवढा जास्त खर्च तेवढी लोकांची जास्त सेवा अशी भावनात्मक स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेत

सर्वांनीच सहभाग घेतला. पाणी देणा-यांनी मग ते शासन, प्रशासन, राजकीय नेतृत्व, तंत्रज्ञ असोत की ज्यांना पाणी द्यायचे ते ग्रामस्थ, ग्रामस्तरीय यंत्रणा किंवा ग्रामस्तरीय लोकनेते असोत. त्यात मुख्यत्वाने ज्या जनतेसाठी पाणी दयायचे त्यांच्या लोकसहभागाचा अभाव असल्याने 'योजना शासनाची, आमची नाही' अशीच जनतेची भावना राहिली. पुरवठा आधारित योजना राबविताना योजना महत्त्वाची नसून पाणी महत्त्वाचे आणि यासाठी आवश्यक स्त्रोत बळकटीकरणाकडे दुर्लक्ष झाले. पुनर्भरण बाजूला ठेवून, पुनर्वापर डावलून प्रत्येक वेळी नवीन योजना तयार करण्यात आल्या. मागच्या वर्षी खोदलेले बोअर पुढच्या वर्षी बाद! शासनप्रणित पुरवठा आधारित धोरण हे 'शासनाचा पुढाकार, लोकांना सेवा पुरवठा' एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले.

जुन्या पुरवठा आधारित धोरणाला सोडचिठ्ठी देऊन लोकसहभागावर आधारित कार्यक्रम आखण्यात यावेत असे धोरण ठरविण्यात आले. या धोरणात ग्रामपंचायत ही केंद्रबिंदू तर ग्रामसभा केंद्रस्थानी असेल. सुविधा निवड, तंत्रज्ञान निवड, निधी वापर इ. सर्व गोष्टी ग्रामपंचायत/गावाच्या मताने लोकांनीच ठरवायच्या आहेत. हे सर्व करत असताना सर्व ग्रामस्थांमध्ये स्वमालकीची 'जाणीव' होण्यासाठी लोकवर्गणीची संकल्पना आली. ग्रामस्थांनी ग्रामस्थांच्या मागणीनुसार आवश्यक पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधांचे नियोजन व अंमलबजावणी करायची, यामध्ये शासनाचा सहभाग फक्त तांत्रिक सहाय्य पुरविणे, निधी उपलब्ध करून देणे व ग्रामस्थांनी मागितलेले इतर सहकार्य इ. पुरता राहणार आहे. कार्यक्रमाची अंमलबजावणी ग्रामसभेत ग्रामस्थांनी नियुक्त केलेल्या ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडे सोपविण्यात आली आहे. स्थानिक पातळीवर जिल्हा परिषद यंत्रणा गावात हवी असलेली सर्वतोपरी मदत करेल म्हणूनच "लोकांचा पुढाकार, त्यात शासनाचा सहभाग" हे या नवीन धोरणाचे ब्रीदवाक्य ठरविण्यात आले आहे.

- आता नियोजन, अंमलबजावणी, देखभाल दुरूस्ती गावाकडे
- स्वमालकीची भावना निर्माण होण्यासाठी योग्य वातावरण निर्मिती
- संपूर्ण व्यवस्थापन ग्रामस्थांकडे

- ग्रामस्थांना मागणीप्रमाणे शासनाचे सहकार्य व मार्गदर्शन हे नव्या धोरणाचे मुख्य सूत्र.

**स्वच्छता - ग्रामीण महाराष्ट्र**

- प्रत्येक ५ पैकी ४ व्यक्ती उघड्यावर शौचास बसतात.
- दररोज उघड्यावर २.५ लाख क्विंटल शौच मैला पडतो.
- दरसाल अस्वच्छ पाणी व गाव परिसरामुळे सरासरी १००० बळी पडतात.
- १३६ लाख मनुष्य दिवसाची दरसाल हानी होते.
- सन १९६०-१९९६ : राज्यातील ९६.२५ लक्ष ग्रामीण कुटुंबापैकी १९९६ पर्यंत केवळ ६ लक्ष कुटुंबाकडे शौचालये होती. शौचालय सुविधेअभावी महिलांची कुचंबणा, प्रदूषण, अस्वच्छ ग्रामीण परिसर व त्याचे जनतेच्या आरोग्यावर विपरित परिणाम.
- सन १९९७-२००० : व्यक्तिगत शौचालय योजनेवर भर. मोठ्या प्रमाणावर शासकीय अनुदान, १६.६१ लक्ष शौचालयांची निर्मिती (पुरवठा आधारित), लोकसहभागाअभावी अयोग्य वापर व स्वच्छतेत भरीव सुधारणा नाही.
- सन २०००-०१ : संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची सुरूवात. ३ वर्षात अतिशय चांगली वातावरण निर्मिती, संपूर्ण स्वच्छतेबाबत "स्वच्छतेतून समृध्दीकडे" हा मूलमंत्र गावोगावी पोहोचलर. श्रमदानातून १००० कोटी पेक्षा अधिक कामे. उपक्रमाची राज्य, राष्ट्र व आंतरराष्ट्रीय स्तरावर जागतिक बँक युनिसेफद्वारे प्रशंसा, संपूर्ण स्वच्छता अभियान राज्यभर सर्वत्र सुरू.
- संपूर्ण स्वच्छता अभियानातील घटक : वैयक्तिक शौचालय, शालेय स्वच्छतागृह, अंगणवाडी शौचालय, सार्वजनिक स्वच्छतागृह

- सन २००३ पासून : 'हागणदारी मुक्त गाव अभियान' अहमदनगर व नांदेड जिल्ह्यात सुरू आहे. पण आता सर्वच जिल्हे यात अग्रेसर.

सन २००३ पासून शासनाने नवीन संपूर्ण स्वच्छता धोरणाचा अवलंब करून राज्यात ग्रामीण भागात शौचालय ऐवजी 'हागणदारीमुक्त गाव अभियाना' वर जास्त भर देण्याचे ठरविले आहे. माहिती, शिक्षण व संवादाद्वारे स्वच्छतेबाबत 'लोकांची गरज' ही धारणा निर्माण करून स्वच्छता व परिसर स्वच्छतेबाबत सर्व कामे मागणी आधारित करण्याचे ठरविले आहे. यातच आता केंद्र शासन पुरस्कृत "निर्मल ग्राम" पारितोषिकाची भर पडली असून १०० टक्के हागणदारीमुक्त गावांना रू. २ ते ४ लाखाचे बक्षिस मिळते.

ए. एल. डिसुझा (१९८५) यांनी "The International Drinking Water Supply and Sanitation Decade" या विषयावरील लेखात म्हटल्याप्रमाणे पिण्याचे पाणी सुरक्षित नसल्यामुळे व मानवी विष्ठेची योग्य विल्हेवाटीचा अभाव असल्यामुळे अनेक प्रकारच्या रोगांचा प्रादुर्भाव होतो. अशुध्द पाणी व अस्वच्छतेमुळे जगातील सुमारे ५०० दशलक्ष लोक अंशत: आंधळे झाले आहेत. २५० दशलक्ष लोकांना हत्तीरोग झाला आहे, २०० दशलक्ष लोकांना लघवीचा त्रास आहे, १६० दशलक्ष लोकांना हिवताप झाला आहे आणि १०० दशलक्ष लोकांना अतिसार/जुलाब झाला आहे. एकट्या भारतात पाण्यामुळे झालेल्या आजारांचा परिणाम म्हणून ७३ दशलक्ष मनुष्यदिन दरवर्षी वाया जातात. भारतात दरवर्षी औषधोपचारांचा खर्च ४५०० दशलक्ष रूपये इतका आहे.

प्रस्तुत लेखकाने यावर काही उपाय सुचविलेले आहेत. भारत सरकारने पंचवार्षिक योजनेत पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी अधिक निधी उपलब्ध करून द्यावा. अशुध्द पाणी व अस्वच्छता या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी सरकार सोबत सर्व पातळीवर लोकसहभाग महत्त्वाचा आहे. त्याबरोबर स्वयंसेवी संघटनादेखील महत्त्वाच्या आहेत.

प्रस्तुत समस्येवर मात करण्यात महिलांचा सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा असणार आहे. कारण कुटुंबातील स्त्रियांना पाणी भरण्याचे कार्य करावे लागते. याशिवाय अशुध्द पाणी व अस्वच्छतेमुळे त्यांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो. अशा परिस्थितीत पाणी पुरवठा व स्वच्छता या दोन्हींचा प्रत्यक्ष फायदा स्त्रियांना अधिक होणार आहे. त्यामुळे स्त्रिया आपल्या घरात स्वच्छता व शुध्द पाणी याबाबत जागृत राहून, समाजजीवनात देखील लक्षणीय योगदान देऊ शकतात. महिला मंडळामार्फत एकत्र येऊन स्त्रियांना अनेक प्रकारे त्यात सहभाग घेता येतो. महिलांच्या सहभागामुळे अशुध्द पाणी व अस्वच्छतेमुळे होणारे रोग ८० टक्के पेक्षा अधिक प्रमाणात नाहीसे करता येतील असे लेखकाचे मत आहे. थोडक्यात व्यक्तीचे आरोग्य आणि पाणी याचा जवळचा संबंध आहे. वैयक्तिक व सामुदायाचे आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी सुरक्षित पाणी पुरवठा व स्वच्छता महत्त्वाची आहे.

श्री. एम. एल. संथनाम (१९८९) यांनी "Community Participation in Rural Water Supply and Sanitation Programmes" या विषयावरील लेख प्रकाशित केलेला आहे. १९८० चे दशक आंतरराष्ट्रीय पाणी पुरवठा आणि स्वच्छता दशक म्हणून घोषित करण्यात आले. प्रस्तुत लेखकाने पिण्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत लोकसहभाग वाढण्यासाठी काही सूचना केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे -

१. कोणत्याही उपक्रमांत लोकसहभाग अत्यावश्यक आहे. उपक्रमांची यशस्विता ही लोकसहभागवर अवलंबून असते. उत्स्फूर्त लोकसहभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यामुळे सामाजिक जनजागृती वाढीस लागते. जबाबदारीची जाणीव होते.

२. स्वच्छता व पाणी पुरवठ्याची तरतूद करताना योग्य तंत्रज्ञान आणि तेथील लोकसमुदाय हे प्रमुख घटक लक्षात घेणे आवश्यक आहे. तेथील लोकांच्या विचारविमर्षातूनच योग्य तंत्रज्ञान निश्चित करावे.

15113

३. संपूर्ण नियोजन प्रक्रियेत गावपातळीचा दृष्टीकोन असला पाहिजे. ज्याठिकाणी लोक राहतात तेथून नियोजनाला सुरूवात करावी. ज्यांच्यासाठी उपक्रम राबविले जाणार आहे तो निर्णयकर्ता असला पाहिजे.

४. लोकसहभाग उपक्रमांत विकास प्राधिकरणाची भूमिका सहकार्याची, सल्लागाराची व समर्थकाची असावी.

५. सुरक्षित पाणी पुरवठा आणि स्वच्छतेसाठी कच-याची योग्य विल्हेवाट याचा फायदा समुदायाच्या आरोग्य सुधारण्यासाठी झाला पाहिजे. हे या उपक्रमांतील अंतिम उद्दिष्ट असावे. त्यासाठी समुदायाला आरोग्यविषयक शिक्षण देणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे या गोष्टी चिरस्थायी टिकून राहतील. त्यामुळे वैयक्तिक व घरगुती स्वच्छता निर्माण होईल आणि प्रदूषण रोखता येईल.

पाणी पुरवठा आणि स्वच्छता या बाबतीतील भारतातील आणि महाराष्ट्रातील स्थिती, लोकसहभागाचे महत्त्व आणि महाराष्ट्र शासनाचे नवे मागणी आधारित धोरण या पार्श्वभूमीवर संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचे महत्त्व अधोरेखित करण्यासारखे आहे.

सन २००४-०५ या साली सुलोचना पाटील यांनी मजरे-कार्वे (ता. चंदगड, जि. कोल्हापूर), राजश्री गवळी यांनी आमशी (ता. करवीर, जि. कोल्हापूर), स्वाती डिगरे यांनी बहिरेवाडी (ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर) आणि प्रस्तुत संशोधिका शीला रामपूरे यांनी कवठेपिरान (ता. मिरज, जि. सांगली) या गावांमध्ये राबविण्यात आलेले "संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण" या शीर्षकाखाली प्रकल्प अहवाल (Project Report) तयार केलेले आहेत. त्या अहवालाचे सारांश रूपाने त्यांच्या अभ्यासाची उद्दिष्टे, अभ्यास पध्दती व प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

वरील सर्व प्रकल्प अहवालात अभ्यासासाठीची पुढील उद्दिष्टे नमूद करण्यात आली आहेत.

१. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचा अभ्यास करणे.

२. अभ्यासाच्या वेळची गावाची परिस्थिती कशी आहे याचा अभ्यास करणे

३. व्यक्तिगत आरोग्य व पाणी व्यवस्थापनाचा अभ्यास करणे. आणि

४. स्वच्छता अभियानामुळे ग्रामीण पर्यावरण संवर्धनास कशी मदत होते याचा अभ्यास करणे.

वरील प्रकल्प अहवालांमध्ये नोंदविण्यात आलेली ठळक निरीक्षण आणि निष्कर्ष सारांशरूपाने पुढीलप्रमाणे -

सर्व अभ्यासकांनी संबंधित ग्रामपंचायतींची निवड सहेतूक पध्दतीने केली आहे. Method अहवालासाठी माहिती गोळा करण्यासाठी ग्रामपंचायतीची माहितीपुस्तिका व्यक्तिगत निरीक्षण पध्दती, प्रमुख व्यक्तींच्या मुलाखती, छायाचित्रे, शासकीय परिपत्रके इत्यादींचा वापर केलेला आहे.

१. स्वच्छता अभियान राबविलेल्या गावांमध्ये प्रत्येक घराघरात ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा साठविला जातो. कचरा निर्मूलनासाठी गावात कचराकुंड्या ठेवल्या आहेत. त्यात जमा झालेला कच-यांचा वापर कंपोस्ट खत तयार करण्यासाठी केला जातो.

२. गावातील परिसर नेहमी स्वच्छ ठेवला जातो.

३. बहुतेक ग्रामपंचायतीमध्ये वैयक्तिक शौचालयाची सुविधा सुध्दा असून, गावातील लोक त्याचा नियमित वापर करतात.

४. सर्वच गावांमध्ये पिण्याच्या पाण्याकडे विशेष लक्ष दिले जाते. पाण्याच्या शुध्दीरणासाठी टी. सी. एल. पावडरचा वापर केला जातो. शिवाय पाणी घेण्यासाठी वगराळ्याचा घरात वापर होतो.

५. गावात पर्यावरण संवर्धनासाठी अनेक उपाययोजना केलेल्या आहेत. त्यात प्रामुख्याने वृक्षतोडबंदी, वृक्षारोपण, गोबरगॅसचा स्वयंपाकासाठी वापर इत्यादीचा समावेश होतो.

६. गावात गुटखाबंदी व दारूबंदी करून १०० टक्के व्यसनमुक्त करण्याचा प्रयत्न बहुसंख्य ग्रामपंचायतीनी केलेला आहे. परंतु त्यांना १०० टक्के यश प्राप्त झालेले नाही.

७. निर्धुर चुलीचा अधिकाधिक वापर करून धुराचा होणारा त्रास कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सन २००५-०६ या वर्षी एकूण दहा अभ्यासकांनी "संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण" या विषयावर दहा वेगवेगळ्या गावांचा अभ्यास करून लघुशोध प्रकल्प अहवाल तयार केले आहेत. त्या अभ्यासकांचे नाव व त्यांनी निवडलेली गावे पुढीलप्रमाणे आहेत.

१. मालती शिरगे - अंकलखोप, ता. पलूस, जि. सांगली

२. जगुबाई वायदंडे - धामणेर, ता. कोरेगाव, जि. सातारा

३. मनिषा सुतार - बाळेघोल, ता. कागल, जि. कोल्हापूर

४. निलम पोवार - पाटेकरवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर

५. सीमा कांबळे - कांबळवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर

६. राज चव्हाण - पाचगाव, ता. करवीर, जि. कोल्हापूर

७. अनिता कावरे - उजनी, ता. माढा, जि. कोल्हापूर

८. सविता पुजारी - शिवणगे, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

९. धनाजी यादव - कुंभारवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर

१०. विनायक जोई - गिजवणे, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

या गावांमध्ये राबविण्यात आलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा अभ्यास केला आहे.

उपरोक्त अभ्यासकांनी प्रकल्प अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे विचारात घेतली होती.

१. स्वच्छता अभियानांगर्तत गावात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा अभ्यास करणे.

२. ग्रामीण परिसराची स्वच्छता, वैयक्तिक आरोग्य, पाणी व्यवस्थापन आणि ग्रामीण पर्यावरण संवर्धन संदर्भात स्वच्छता अभियानामुळे घडून आलेल्या परिवर्तनाचा आढावा घेणे.

३. स्वच्छता अभियान व लोकसहभाग यांचा अभ्यास करणे.

सर्व अभ्यासकांनी संबंधित गावांची निवड सहेतूक नमुना निवड पध्दतीने केलेली होती. तथ्य संकलनासाठी ग्रामपंचायतींची माहितीपुस्तिका, शासकीय परिपत्रके इत्यादीचा वापर केलेला आहे. स्वच्छता अभियानाचा प्रभाव अभ्यासण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीतील २५ कुटुंबाची सहेतुक पध्दतीने निवड करून निवडलेल्या कुटुंबातील प्रमुख व्यक्तींची मुलाखत घेण्यात आलेली आहे. मुलाखतीद्वारा मिळविलेल्या माहितीच्या आधारे स्वच्छता अभियानातील स्त्री-पुरुष सहभाग किती प्रमाणात होता हे तपासून पाहण्यात आले आहे.

१. वरील गावात लोकवर्गणीतून गावातील प्रमुख रस्ते दुरूस्त केले आहेत. तसेच काही नवे रस्ते तयार करण्यात आले आहेत.

२. गावातील सांडपाणी गटारीच्या माध्यमाने गावाच्या बाहेर खड्डयात सोडण्यात आले आहे.

३. ब-याच गावात सांडपाण्याचा वापर घरगुती परसबाग फुलविण्यासाठी करण्यात आला आहे.

४. बहुतेक गावात घराघरात कचराकुंड्या असून त्यात ओला कचरा व सुका कचरा असा वेगळा केला जातो. गावातील वॉर्डबॉईज कचरा पेटीतील कचरा एकत्र करून त्याचा कंपोस्ट खत निर्मितीसाठी वापर करतात.

५. विद्यार्थ्यांमार्फत त्या त्या गावातील शाळांचे परिसर स्वच्छ करून घेतले आहेत. शिवाय मुलांमध्ये व्यक्तिगत स्वच्छतेविषयी जाणीव निर्माण केली आहे. त्यात स्वच्छ अंघोळ, नखे कापणे, केस विंचरणे, गणवेश इ. बाबींचा समावेश आहे.

६. गावातील जे लोक व्यक्तिगत किंवा सार्वजनिक शौचालयांचा वापर करत नाहीत त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही केली जाते.

७. पिण्याच्या पाणी व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष दिले जाते. पाणी शुध्दीकरणाबरोबर पाण्याच्या काटकसरीने वापराची काळजी घेतली जाते. त्यासाठी घरोघरी पाण्यासाठी वगराळ्याचा वापर होताना दिसते.

८. गावात तुळशीची रोपे लावून ऑक्सीजन पार्क तयार करण्यात आले आहेत.

९. गाव व्यसनमुक्त व्हावे यासाठी सर्वच गावात गुटखाबंदी व दारूबंदी जाहीर केली आहे.

१०. ग्रामीण पर्यावरणाच्या संवर्धनासाठी वृक्षारोपण, कु-हाडबंदी, वृक्षबंदी, निर्धुर चुलींचा वापर, गोबरगॅसला प्रोत्साहन, प्लास्टिक वापरावर बंदी सौरऊर्जेचा वापर, जनावरांच्या गोठ्यांची स्वच्छता याकडे प्रत्येक गावात अधिक लक्ष दिले जात आहे.

११. या अभियानात लोकसहभाग अत्यंत मोठ्या प्रमाणावरील असल्याचे वरील अभ्यासकांनी नमूद केले आहे.

# विभाग - २

## २.२ पध्दतीशास्त्र (Methodology)

प्रस्तुत विभागात संशोधन विषयाची निवड, संशोधनासाठी निवडलेली नेमकी समस्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधन क्षेत्र, नमुना निवडीची पध्दत, तथ्य संकलनासाठी वापरलेले तंत्र, तथ्य संकलन, माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण आणि प्रकरणांची रूपरेषा या संशोधन आराखड्याच्या विविध पैलूंचे विवेचन केले आहे.

## २.२.१ संशोधन विषयाची निवड (Selection of the Research Topic)

आजही जवळपास ६५ ते ७० प्रतिशत लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. एवढ्या मोठ्या लोकसंख्येसमोर अनेक गंभीर स्वरूपाच्या समस्या आहेत. त्यापैकी कांही स्वच्छतेच्या बाबतीत आहेत, काही पाण्याच्या बाबतीत आहेत, तर काही आरोग्याच्या बाबतीत आहेत, काही आरोग्य शिक्षणाच्या बाबतीत आहेत. या गंभीर समस्या दूर करून ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पाणी पुरवठा, ऊर्जा, पर्यावरण यांच्यामध्ये गावपातळीवर आवश्यक सुधारणा करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची सुरूवात २०००-२००१ पासून केलेली आहे. त्याचे चांगले परिणाम काही ग्रामीण भागात दिसून आलेले आहेत. या पार्श्वभूमीचा विचार केल्यानंतर या अभियानामध्ये महिलांनी कितपत सहभाग घेतलेला आहे, या अभियानाचा ग्रामीण पर्यावरणाच्या संवर्धनासाठी या अभियानाचे योगदान कसे महत्त्वपूर्ण आहे हे तपासून पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केली आहे.

## २.२.३ संशोधन समस्या (The Research Problems)

"ग्रामस्वच्छता अभियानातील स्त्रियांचा सहभाग आणि ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव : सांगली व कोल्हापूर जिल्हयातील दोन निवडक गावाचा अभ्यास" असा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे.

ग्रामस्वच्छता अभियानात महिलांचा सहभाग कितपत आहे, सदर अभियानाचा महिलांवर तसेच एकंदर ग्रामीण पर्यावरणावर कोणता परिणाम झाला आहे याचा शोध घेणे ही प्रस्तुत अभ्यासासाठीची प्रमुख समस्या आहे.

### २.२.४ संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives of the Study)

संशोधनासाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली.

१. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील दोन निवडक गावातील, ग्रामस्वच्छता अभियानातील अभियानातील महिलांचा सहभाग अभ्यासणे .

२. ग्रामस्वच्छता अभियानाचा ग्रामीण महिलांवरील प्रभाव/परिणाम अभ्यासणे.

३. निवडक गावातील ग्रामस्वच्छता अभियानाचा ग्रामीण पर्यावरणावरील प्रभावाचे परीक्षण करणे.

### २.२.५ संशोधन पध्दत (Research Methodology)

प्रस्तुत संशोधनासाठी अवलंबिण्यात आलेल्या संशोधन पध्दतीचे विवेचन खाली दिले आहे.

#### २.२.५.१ संशोधन क्षेत्र (The Study Area)

सदरचे संशोधन करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील शेळकेवाडी हे गाव, तसेच सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील कोरेगाव हे गाव अशी दोन गावे निवडली आहेत. प्रस्तुत अभ्यासाचे क्षेत्र या दोन गावापुरते मर्यादित आहे.

#### २.२.५.२ नमुना निवड (Sampling Plan)

**अ) गावांची निवड (Selection of Villages)**

ज्या गावात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत काही भरीव स्वरूपाचे काम झाले आहे, अशाच गावांची प्रस्तुत अभ्यासासाठी निवड करणे क्रमप्राप्त होते. कारण जेथे सदर अभियानांतर्गत काही काम झाले असेल तेथेच त्याचा महिलांवरील

व ग्रामीण पर्यावरणावरील परिणाम अभ्यासणे शक्य होईल. म्हणून गावांची निवड करताना पारितोषिक प्राप्त गावांचा विचार करण्यात आला. त्यानुसार सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील, जिल्हास्तरीय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या २०००-२००१ ते २००५-०६ या सहा वर्षातील पुरस्कारप्राप्त गावांची यादी तयार करण्यात आली. सदर यादी खाली दिली आहे.

**सारणी क्रमांक २.१**

**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हास्तरीय क्रमांक मिळविलेल्या गावांची यादी (२०००-०१ ते २००५-०६)**

| अ. क्र. | वर्ष | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २०००-०१ | मजरे-कार्वे, ता. चंदगड | दत्तवाड, ता. शिरोळ | सडोली खालसा ता. करवीर |
| २ | २००१-०२ | बहिरेवाडी, ता. पन्हाळा | आमशी, ता. करवीर | चंद्रे, ता. राधानगरी मजरेवाडी, ता. शिरोळ |
| ३ | २००२-०३ | आमशी, ता. करवीर | मडिलगे खुर्द, ता. भुदरगड जैन्याळ, ता. कागल | सावते, ता. शाहुवाडी जाखले, ता. पन्हाळा |
| ४ | २००३-०४ | जैन्याळ, ता. कागल | निलेवाडी, ता. हातकणंगले | मुसळवाडी, ता. राधानगरी |
| ५ | २००४-०५ | कांबळवाडी, ता. राधानगरी | निलेवाडी ता. हातकणंगले कुंभारवाडी, ता. राधानगरी | शिवणगे, ता. चंदगड माझगाव, ता. पन्हाळा |
| ६ | २००५-०६ | कांबळवाडी, ता. राधानगरी | शेळकेवाडी, ता. करवीर निलेवाडी, ता. हातकणंगले | शिवणगे ता. चंदगड |

संदर्भ : जिल्हा परिषद, कोल्हापूर

### सारणी क्रमांक २.२

### संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील सांगली जिल्ह्यातील जिल्हास्तरीय क्रमांक मिळविलेल्या गावांची यादी (२०००-०१ ते २००५-०६)

| अ. नं. | वर्ष | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २०००-०१ | तुंग, ता. मिरज | अंकलखोप, ता. पलूस | कवठेपिरान, ता. मिरज |
| २ | २००१-०२ | अंकलखोप, ता. पलूस | य. पा. वाडी, ता. आटपाडी | माळवाडी, ता. मिरज |
| ३ | २००२-०३ | भिलवडी, ता. पलूस | राडेवाडी, ता. पलूस | आरवडे, ता. तासगाव ऐतवडे खुर्द, ता. वाळवा |
| ४ | २००३-०४ | कवठेपिरान, ता. मिरज | गोटखिंडी, ता. वाळवा | सांगोले, ता. खानापूर |
| ५ | २००४-०५ | भिलवडी स्टेशन, ता. पलूस | सांगोले, ता. खानापूर कोरेगाव, ता. वाळवा | नागेवाडी, ता. तासगाव |
| ६ | २००५-०६ | कोरेगाव, ता. वाळवा | सूर्यगाव, ता. वाळवा | कासलिंगवाडी, ता. जत |

संदर्भ : जिल्हा परिषद, सांगली

सर्वप्रथम कोल्हापूर जिल्ह्यातील पुरस्काप्राप्त १८ व सांगली जिल्ह्यातील १६ गावासंबंधीची सर्वसाधारण माहिती मिळविण्यात आली. यापैकी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील कोरेगाव हे गाव आणि कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील शेळकेवाडी अशी दोन गावे सहेतुक नमुना निवड (Purposive Sampling) पध्दतीने निवडण्यात आली. अभ्यासाची उद्दिष्ट्ये आणि त्यासाठी आवश्यक ती माहिती तत्परतेने उपलब्ध करून देण्याबाबत ग्रामसेवक व गावातील सरपंच यांनी दाखविलेली तयारी यामुळे वरील गावांची निवड करणे शक्य झाले.

### ब) उत्तरदात्यांची निवड (Selection of Respondents)

प्रस्तुत अभ्यासासाठी उपलब्ध असणा-या वेळ, श्रम आणि पैसा या मर्यादांचा विचार करून कोरेगाव आणि शेळकेवाडी या दोन्ही गावातील एकंदर २०० कुटुंबे निवडण्याचे निश्चित केले. कोरेगावातील एकूण कुटुंबाची संख्या ८४० आहे.

त्यापैकी १८५ कुंटुंबाची निवड करण्यात आली. शेळकेवाडीत एकूण कुंटुंबाची संख्या ६५ आहे. त्यापैकी १५ कुटुंबाची निवड करण्यात आली. या २०० कुटुंबातील प्रत्येकी एका स्त्री उत्तरदात्यांची निवड करण्याचे निश्चित केले. प्रथम कुटुंबे निवडून त्यातील महिलांची निवड करण्याचे ठरविले. निवडलेल्या शेळकेवाडी व कोरेगाव या गावातील कुटुंबाची निवड करताना 'स्तरीत व प्रमाणशीर नमुना' (Stratified Sample with Propotional Allocation) निवड पध्दतीचा वापर केला. दोन्ही गावातील एकूण कुटुंबाची संख्या, निवडलेल्या कुटुंबाची संख्या व त्याचे एकूण कुटुंबाशी असलेले प्रतिशत प्रमाण पुढील सारणीत दिले आहे. या निवडलेल्या कुटुंबातील प्रत्येकी एका स्त्रीची उत्तरदाता म्हणून प्रस्तुत अभ्यासासाठी निवड करण्यात आली.

**सारणी क्रमांक २.३**

**निवडक गावातील उत्तरदात्या महिलांची नमुना निवड**

| अ. क्र. | घटक | कोरेगाव | शेळकेवाडी | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण कुटुंबाची संख्या | ८४० | ६५ | ९०५ |
| २ | निवडलेल्या कुटुंबाची संख्या | १८५ | १५ | २०० |
| ३ | नमुन्याचे एकूण कुटुंबाशी प्रमाण | २२.०२ | २३.०७ | २२.०९ |

## २.२.५.३ तथ्य संकलनासाठी वापरलेली साधने (Instruments of Data Collection).

सदर अभ्यासाची उद्दिष्ट्ये लक्षात घेऊन माहितीचे संकलन करण्यासाठी १) व्यक्तिगत निरीक्षण २) प्रश्नावली ३) मुलाखत अनुसूची ४) छायाचित्रे या तंत्राचा अवलंब करण्यात आला आहे.

### १. व्यक्तिगत निरीक्षण

निवडक गावांचा अभ्यास करताना प्रस्तुत संशोधकाच्या व्यक्तिगत निरीक्षणाचाही समावेश करण्यात आला आहे. स्वच्छतेचा अवलंब गावातील लोकांनी कशा प्रकारे केलेला आहे; त्यात रस्त्याची स्वच्छता, घरातील कचराकुंडी, परसबाग, घरातील भांडी व कपडे यांची व्यवस्था, जनावरांच्या गोठ्यांची स्वच्छता, घराची

सजावट, सांडपाण्याची विल्हेवाट, शोषखड्डे इत्यादीचा समावेश होतो. या बाबीचे निरीक्षण करण्यात आले.

**२. प्रश्नावली**

कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील जिल्हा पातळीवर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पुरस्कार प्राप्त गावांची सर्वसाधारण माहिती प्राप्त करण्यासाठी प्रश्नावलीचा आधार घेण्यात आला. प्रश्नावलीमध्ये पुरस्कार विजेत्या गावातील एकूण लोकसंख्या, त्यातील स्त्री-पुरुषांची संख्या, एकूण कुटुंबाची संख्या, भौगोलिक क्षेत्र, आरोग्य सुविधा, शाळा, महाविद्यालये, वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयाची संख्या, पाण्याचे स्त्रोत अशा विविध घटकांचा समावेश केलेला आहे.

**३. मुलाखत अनुसूची**

प्रस्तुत अभ्यासाच्या उद्दिष्टानुसार मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली. सदर मुलाखत अनुसूचीची पूर्वचाचणी (Pre-testing) घेण्यात आली व आवश्यक तेथे प्रश्नांमध्ये बदल करण्यात आले. सुधारित संरचित मुलाखत अनुसूचीद्वारे कोरेगाव व शेळकेवाडी येथील एकूण २०० महिला उत्तरदात्यांची मुलाखत घेण्यात आली. त्यामध्ये स्वच्छता अभियानात महिलांचा सहभाग, अभियानाचा महिलांवरील व ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव इत्यादी प्रकारची माहिती घेण्यात आली. सदर मुलाखत अनुसूची १० पानांची असून प्रस्तुत लघुशोधप्रबंधाच्या शेवटी परिशिष्ट' ड' मध्ये देण्यात आली आहे.

**४. छायाचित्रे**

ग्रामस्वच्छता अभियानाचे चित्र अधिक स्पष्ट व्हावे आणि ग्रामपंचायतीने व गावातील लोकांच्या सहभागाने अभियानाद्वारे केलेल्या कार्याची वास्तव माहिती व्हावी, यासाठी छायाचित्रे तंत्राचा अवलंब या अभ्यासासाठी करण्यात आला आहे. त्यामध्ये लोकसहभागातून केलेली परिसर स्वच्छता, रस्त्यांची स्वच्छता, परसबाग, शोषखड्डे, अशा अनेक गोष्टी विचारात घेण्यात आलेल्या आहेत. एकूण १५ छायाचित्रांचा त्यात समावेश केलेला आहे. (स्वच्छता अभियानाची छायाचित्रे प्रस्तुत शोधप्रबंधाच्या शेवटी (परिशिष्ट'अ) छायाचित्रे विभागात देण्यात आली आहेत.)

### २.२.५.४ तथ्य संकलन (Data Collection)

ऑक्टोबर २००५ ते एप्रिल २००७ या कालावधीमध्ये प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संकलित केली. त्यासाठी सांगली जिल्हा परिषद व कोल्हापूर जिल्हा परिषद येथे भेटी देऊन २०००-०१ ते २००५-०६ या कालावधीत जिल्हा पातळीवर स्वच्छता अभियानात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक विजेत्या गावांची माहिती घेतली. सांगली जिल्ह्यातील कोरेगाव व कोल्हापूर जिल्हयातील शेळकेवाडी या गावांची सविस्तर अभ्यासासाठी तेथील ग्रामपंचायत कार्यालयातील अहवाल मिळविण्यात आला. २०० उत्तरदात्या महिलांची मुलाखत अनुसूचीद्वारे माहिती संकलित केली. त्यासाठी वेळोवेळी दोन्ही गावांना भेटी देण्यात आल्या. या भेटीच्या वेळी कोरेगाव व शेळकेवाडी येथील महिला उत्तरदात्यांचा प्रतिसाद चांगला मिळाला.

### २.२.५.५ माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण (Data Analysis and Presentation)

मुलाखत अनुसूचीद्वारे संकलित केलेल्या माहितीचे सुयोग्य वर्गीकरण आणि विश्लेषण करण्यासाठी संगणकाचा वापर करून त्या माहितीवर प्रक्रिया करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार एक संकेत सारणी (Codebook Sheet) तयार आले. त्यानुसार मिळविलेल्या माहितीचे सुयोग्य सांकेतीकरण (Coding) केले. त्यानंतर संगणकीय संख्याशास्त्रीय प्रक्रिया करण्यासाठी MS-Excel आणि SPSS पॅकेजचा वापर करण्यात आला आणि अशी माहिती अहवालात वर्गीकृत स्वरूपात तिचे विश्लेषण करण्यात आले आहे.

### २.२.५.६ संशोधनाच्या मर्यादा (Limitations of the Study)

प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादा खालीलप्रमाणे -

१. अभ्यासासाठी केवळ दोनच गावांची निवड करण्यात आली आहे.

२. प्रस्तुत अभ्यासाचे निष्कर्ष प्रामुख्याने निवडक गावानांच लागू पडतील.

✓३. शेळकेवाडी व कोरेगाव या दोन्ही गावांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आलेला नाही.

### २.२.५.७ प्रकरण नियोजन (Chapter Scheme)

संकलित केलेल्या माहितीचे अर्थपूर्ण संघटन करून खालील प्रकरणात अहवालाची विभागणी करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | : | संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचे स्वरूप |
| प्रकरण दुसरे | : | साहित्याचे परिशीलन आणि पध्दतीशास्त्र |
| प्रकरण तिसरे | : | कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील अभियानातील यशस्वी गावे आणि निवडक गावातील ग्रामस्वच्छता अभियानाची अंमलबजावणी |
| प्रकरण चौथे | : | संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान : लोकसहभाग आणि प्रभाव |
| प्रकरण पाचवे | : | सारांश आणि निष्कर्ष |

संदर्भ

1. Government of India (2002) : "Water Supply and Sanitation in India", Country Report prepared by the Planning Commission, downloaded from the website:http.www. planningcommission.nic.in

2. Government of India (2003) : "Towards Total Sanitation and Hygine : A Challenges for India", Country Paper, South Asian Conference on Sanitation, Dhaka, Bangladesh, held during 21st to 23rd October 2003, downloaded from the website of Department of Water supply and Sanitation, Governmetn of India.

3. Government of Maharashtra, "Jalaswaraj : Pure Water and Clean Vilalge" (in Marathi), A booklet published by the Department of Water Supply and Sanitation, Mumbai

4. A. L. D'souza, article on "The International Drinking Water Supply and Sanitation Decade" is published inYojana, June 1st, Vol. 15, 1985, p. 16-17

५. M. L. Santhanam, article published in 'Social Change', March 1989, Vol. 19, No. 1

६. सुलोचना पाटील, (२००४-०५), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : मजरे-कार्वे (ता. चंदगड, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

७. राजश्री गवळी, (२००४-०५), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : आमशी (ता. करवीर, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

८. स्वाती डिगरे, (२००४-०५), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : बहिरेवाडी (ता. करवीर, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

९. शीला रामपूरे, (२००४-०५), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : कवठेपिरान (ता. मिरज, जि. सांगली) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१०. मालती शिरगे, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : अंकलखोप (ता. पलूस, जि. सांगली) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

११. जगुबाई वायदंडे, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : धामणेर (ता. कोरेगाव, जि. सांगली) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१२. मनिषा सुतार, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : बाळेघोल (ता. कागल, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१३. निलम पोवार, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : पाटेकरवाडी (ता. करवीर, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१४. धनाजी यादव, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : कुंभारवाडी (ता. राधानगरी, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१५. जोई रामचंद्र, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : गिजवणे (ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१६. सविता पुजारी, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : शिवणगे (ता. चंदगड, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१७. चव्हाण राज, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : पाचगाव (ता. करवीर, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१८. अनिता कावरे, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : उजनी (ता. माढा, जि. सोलापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१९. सीमा कांबळे, (२००५-०६), संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि ग्रामीण पर्यावरण : कांबळवाडी (ता. राधानगरी, जि. कोल्हापूर) या गावाचा अभ्यास, एम. ए. भाग-२ साठी सादर केलेला अप्रकाशित प्रकल्प अहवाल, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर